वर्ष-०८ | अंक-४८ | मुंबई, मंगळवार १८ ते २४ ऑक्टोबर - २०२२ | पृष्ठ-४

पोलीस बातमी पत्र

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
ओठांच्या बदलत्या रंगावरून जाणून घ्या आरोग्य स्थिती: लाल, गुलाबी, पांढऱ्या, काळ्या ओठांमध्ये दडलेली आरोग्याची रहस्ये

3 → समाजमाध्यमांवर नियंत्रण हवं खरं, पण ते कुणाचं?

बलात्कारातील आरोपीला लग्नाच्या अटीवर उच्च न्यायालयातून जामीन मंजूर ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## विदेशी दारूत पाण्याची भेसळ

## दारूच्या बाटलीत पाणी टाकून पुन्हा सीलबंद करतानाचा व्हिडीओ व्हायरल

ठाणे : विदेशी दारूत पाण्याची मिलावट करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. दारूच्या बाटलीत पाणी टाकून पुन्हा सीलबंद करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. दारूत पाणी मिसळण्याचा हा प्रकार ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील असल्याचे बोलले जात आहे. झटपट पैसे कमविण्याच्या नादात विविध गोरखधंदे शोधून त्यातून पैसे मिळविले जात आहेत. असाच या गोरखधंद्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विविध कंपन्यांच्या विदेशी दारूच्या मोठ्या बाटल्यांमधून दारू काढून ती इतर ठिकाणी विक्री करत



असल्याचे उघड झाले आहेत.

विदेशी दारू काढून त्या ऐवजी तेवढेच पाणी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात देशी, विदेशी दारूची साठवणूक करणारी गोदामे आहेत. या गोदामांतून दररोज बहुतांश टेम्पोमधून जिल्ह्यातील वाईन शॉप आणि बार रेस्टॉरेंटमध्ये विदेशी दारूची वाहतूक केली जाते. मात्र गोदामातून वाहतूक करणारी गाडी निघताच अंधाराचा फायदा घेत टेम्पोमध्ये विदेशी दारूच्या पॅक बाटलीचे झाकण चलाखीने उघडून त्यामधून काही विदेशी दारू काढून त्या ऐवजी तेवढेच पाणी टाकून बाटली पुन्हा सीलबंद करण्यात येत असल्याचे व्हायरल व्हिडीओमधून दिसून येत आहे.

गोरखधंद्याला आळा घालणार का?

दरम्यान, विदेशी दारूच्या बाटलीत पाणी टाकून त्या बाटलीतील दारूच्या विक्रीचा गोरख धंदा विशेषतः ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सुरु असल्याची चर्चा व्हायरल व्हिडीओच्या मध्यमातून समोर आली आहे.

## साडेदहा लाखांचा गुटखा पकडला; कोपरखैरणे पोलिसांची धडक कारवाई

नवी मुंबई : मानवी आरोग्यास अपायकारक असलेला तब्बल साडेदहा लाख रु. किमतीचा गुटखा तसेच सुगंधित सुपारी जप्त करण्यात आली आहे. गेल्या चार महिन्यात कोपरखैरणे पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे. 19 जुलैला रात्री अकरा वाजता कोपरी गावातील पवार चाळीतील रूम 205 मधून 9 लाख 55 हजारांचा गुटखा जप्त करण्यात आला असून अज्ञात आरोपी फरार आहे.

आरोपींना अटक - कोपरखैरणे बोनकोडे गावामधील पित्रुछाया निवास या सोसायटीतील घर क्रमांक 46/1 इथे 3 ऑगस्टला पोलिसी कारवाई दरम्यान 60 हजार सहाशे रु. किमतीचा गुटखा



पकडण्यात आला. ही पोलिसी कारवाई 3 ऑगस्टला करण्यात आली. आरोपी मुमताज अहमद नफीज अहमद (वय 34 वर्षे) असे आरोपी महिलेचे नाव असून तिला अटक करण्यात आली आहे. तिच्यावर भादंवि कलम 328 आणि 273 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. 13 ऑक्टोबरला कोपरखैरणे सेक्टर 23 मधून 64 हजार रु. किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी आझाद प्रताप श्रीकांत यादव (वय 19 वर्षे) यालाही अटक करण्यात आली आहे. यादववर भादंवि कलम 436, 328, 272, 273 आणि 188 अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले.बेकायदेशीर विक्रीसाठी गुटख्याची साठवणूक-महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला व मानवी आरोग्यास अपायकारक , मानवी जिवितास धोका दुखापत करणाऱ्या गुटख्याची बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने हा गुटखा साठवला असल्याची खात्रिशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे कोपरखैरणे पोलिसांनी ही कारवाई केली असल्याची माहिती परिमंडळ 1चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिली आहे.

## पत्नीला सासरी पाठविण्यास नकार दिल्याने जावयाची सटकली, मग काय थेट सासऱ्याला...

औरंगाबादच्या वाळूज भागात एक आगळीवेगळी घटना समोर आली आहे. पत्नीला सासरी पाठविण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या जावयाने मामा व वडिलांच्या मदतीने सासऱ्याला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची परिसरात जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाजिया अफरोज सय्यद (रा. वाळूज) या विवाहितेचा सासरच्या मंडळीसोबत कौटुंबिक वाद असल्याने ती वाळूजला माहेरी निघून गेली होती. त्यानंतर पती अफरोज सय्यद, सासरे अफसर सय्यद व अफरोज याचे मामा इलियास सय्यद (सर्व रा. वाळूज) हे बुधवारी दुपारी अडीचच्या सुमारास नाजियाचे वडील अहेमद मोहम्मद पठाण यांच्या घरी गेले होते. यावेळी सासरे अफसर सय्यद व मामा इलियास सय्यद या दोघांनी वडील अहेमद पठाण यांची भेट घेऊन नाजिया हिला नांदविण्यास पाठवा, असे सांगितले. मात्र, नाजिया हिची सासू शब्बू यांना आणल्याशिवाय मुलीला सासरी




पाठविणार नाही, असा पवित्रा अहेमद पठाण यांनी घेतला होता. त्यामुळे वादाला सुरवात झाली. वडिलांनी मुलीला पाठवण्यास नकार दिल्याने जावई अफरोज सय्यद आणि त्याच्यासोबत आलेल्या तिघांनी मुलीच्या वडीलांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. या वादात जावई अफरोज सय्यद याने कारमधून लाकडी दांडा आणून सासरे अहेमद पठाण यांच्या डाव्या कानावर मारल्याने ते जखमी झाले. यानंतर जावई अफरोज याने पुन्हा सासऱ्यास दांड्याने मारहाण केली व तिघेही कारमधून पसार झाले. या प्रकरणी अहेमद पठाण यांच्या फिर्यादीवरून जावई अफरोज सय्यद, व्याही अफसर सय्यद व इलियास सय्यद (सर्व रा. वाळूज) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अश्लील फोटो व्हायरल करण्याची विवाहितेला धमकी

दुसऱ्या एका घटनेत विवाहितेकडे लग्नाचा तगादा लावून तिला अश्लील फोटो तयार करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन एकाने 25 हजार रुपये खंडणीची मागणी केल्याची घटन समोर आली आहे. याप्रकरणी दोघांविरुध्द छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख फरहान शेख नूर, सय्यद फिरोज सय्यद अकबर (दोघेही रा. चांदमारी) अशी आरोपींची नावे आहेत. छावणीतील एका 28 वर्षीय विवाहितेकडे 'तू पतीला सोडून माझ्याशी लग्न कर, मी तुझ्या मुलांचा सांभाळ करेल' असा तगादा शेख फरहान याने लावला. मात्र, विवाहिता नकार देत असल्यामुळे त्याने अश्लील फोटो तयार करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी पीडितेला दिली. याशिवाय महिलेच्या दिराच्या मोबाईलवर संपर्क साधून दोघांनी 25 हजार रुपये दिले नाही, तर फोटो व्हायरल करूअसेही धमकावले होते.

## अभ्यास न केल्याने आई रागावली; घर सोडून पळून गेलेल्या अल्पवयीन मुलीने रचली अपहरणाची गोष्ट

नागपूरमधून थेट चंद्रपुरात सापडलेल्या एका मुलीने आपले अपहरण केल्याचा दावा केला. मात्र, पोलिसांनी केलेल्या चौकशीत ही गोष्ट बनाव असल्याचे समोर आले. अभ्यास न केल्याने आई रागवल्याने एका 14 वर्षीय मुलीने घर सोडून चंद्रपूर गाठले. मात्र, पुढे काय करावे हे न सुचल्याने या मुलीने जवळच्या पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि आपले अपहरण झाल्याचे सांगितले. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात या मुलीने स्वतःच घर सोडल्याचे समोर आले. नागपूर येथील नंदनवन परिसरात राहणारी 14 वर्षीय मुलगी शुक्रवारी दुपारी घरातून निघाली होती. सायंकाळी उशिरापर्यंत ती घरी न पोहोचल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. पण, ती कुठेच न




सापडल्याने कुटुंबीयांनी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र, ही मुलगी थेट चंद्रपूरमध्ये सापडल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले होते. ही अल्पवयीन मुलगी चंद्रपूर पोहोचल्यावर रामनगर ठाण्यात जाऊन दोन महिलांनी कारमधून आपले अपहरण केल्याचे पोलिसांना सांगितले. मोठ्या प्रयत्नांनंतर आपण महिलांच्या तावडीतून बचावलो असल्याची माहिती तिने चंद्रपूर पोलिसांना दिली.

स्वत: रचली अपहरणाची गोष्ट

पोलिसांनी केलेल्या तपासात ही अल्पवयीन मुलगी खोटं बोलत असल्याचे समोर आले. या अल्पवयीन मुलीने आपल्या अपहरणाचा प्रयत्न झाल्याचे सांगितल्याने पोलिसांनी तिने दिलेल्या माहितीनुसार, तपास सुरू केला.

पोलिसांनी संबंधित ठिकाणचे सीसीटीव्ही फूटेज तपासले. त्यामध्ये ही मुलगी खोटं बोलत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर पोलिसांनी तिला विश्वासात घेत विचारपूस केली. त्यामध्ये तिने आई अभ्यासासाठी रागवल्याने घरातून पळून आल्याचे सांगितले. नागपूरमधील घरातून निघून चंद्रपूरला आल्यानंतर पुढे काय करावे हे सुचले नाही. त्यामुळे तिने चंद्रपूर पोलीस गाठले आणि पोलिसांना अपहरण झाल्याची माहिती दिली.

## खेळाडूंची फसवणूक करून फरार झालेल्या मॅरेथॉन आयोजकाची आत्महत्या

कोल्हापूर: राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंची मॅरेथॉनच्या नावाखाली नोंदणी शुल्क घेऊन गायब झालेला कमांडोज हाफ मॅरेथॉन स्पर्धेचा मुख्य आयोजक वैभव पाटील (वय ४५ रा.तिरपण, ता. पन्हाळा) याने काल रविवारी पहाटे तिरपण गावी शेतात



झाडाला गळफास लावून आत्महत्या केली.कोल्हापूरात कमांडो हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगत खोटी नोंदणी करून खेळाडूंची फसवणूक करण्यात आली होती. आपली फसवणूक झाली आहे कळतात सर्व खेळाडूंनी शनिवारी रात्री उशिरा शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र आता मॅरेथॉनच्या मुख्य आयोजकानेच आत्महत्या केल्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यासह कर्नाटक, दिल्ली, हरियाणा, पंजाब, पश्चिम बंगाल आदी राज्यातून स्पर्धकांनी या कमांडोज हाफ मॅरेथॉन स्पर्धेसाठी नोंदणी केली होती. त्यासाठी विविध गटानुसार ६०० ते १८०० रुपयांचे नोंदणी शुल्क आकारले होते. या स्पर्धेसाठी शनिवारी सायंकाळपर्यंत स्पर्धक कोल्हापुरात दाखल झाले होते. पण स्पर्धेचा मुख्य आयोजक वैभव पाटील हा अचानक गायब झाल्याने खेळाडूंत खळबळ माजली होती.

## जुन्या वैमनस्यातून युवकाचा खून; तिघांना अटक, दोन दिवसांनंतरही एक आरोपी फरारच




जुन्या वाद उकरून काढत वारंवार जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यांनाच चौघांनी धारदार शस्त्रांनी घाव घालीत खून केला. वाठोडा ठाण्याच्या हद्दीतील श्रीरामनगर झोपडपट्टीतील गौसशाह वली दर्ग्याजवळ ही थरारक घटना घडली. या प्रकरणी वाठोडा पोलिसांनी आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली आहे. तर घटनेच्या दोन दिवसानंतरही एक मारेकरी अद्याप फरार आहे. आरीफ हुसेन आदीब हुसेन (27) रा. श्रीरामनगर झोपडपट्टी असे मृताचे नाव आहे. सोनू ऊर्फ अशपाक आशू शेख (24), दादू ऊर्फ शुभम गजभिये (25), मोहम्मद ईब्राहीम मोहम्मद शकील ऊर्फ रिजवान (23), शाहरूख खान वल्द छोटे खान पठाण (25) अशी आरोपींची नावे आहेत. मृतक आणि आरोपी सर्व एकाच वसाहीतीत रहातात. यामुळे एकमेकांचे परिचित आणि जुने मित्रही होते. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, श्री व्हीलरवर कबाडीचा व्यवसाय करणारा आरीफ आणि सोनू यांच्यात सात ते आठ महिन्यांपूर्वी भांडण झाले होते. त्यानंतर आरीफ सातत्याने वाद उखरून काढायचा. सोबतच सोनूला जीवे मारण्याच्या धमक्या देत होता. यामुळे सोनूच्या मनात राग होता. आरीफ आपला गेम करेल, अशी भितीही होती. ही भिती कायमची घालविण्यासाठी आरीफच्या खुनाची योजना त्याने आखली. त्यात अन्य तीन मित्रांना सोबत घेतले. गुरूवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास आरीफ घराजवळ एकटा उभा होता. सोनू आणि त्याचे साथीदार शस्त्रांसह तिथे पोहोचले. आरीफ बेसावध असतानाच त्याच्यावर अचानक वार करणे सुरू केले. आरीफ रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्यानंतर आरोपी पळून गेले. घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला. माहिती मिळताच वाठोडा पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला.

## फॉगसिटी हादरली ! लाखों रुपयांचे दागिने लंपास...दोन घरांवर दरोडे

**इगतपुरी (नाशिक)** : नाशिकच्या घोटी परिसरातील दोन घरांवर सशस्त्र दरोडा पडल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. यामध्ये लाखों रुपयांचे दागिने आणि रोख रक्कमेची लूट केली आहे. यावेळी दरोडेखोरांनी पुरुषांवर तलवारीने वार केले तर लहान मुलांच्या अंगावर असलेले दागिने देखील लुटले आहे. घोटी परिसरात राहणारे भधे आणि खान कुटुंबाच्या घरी दरोडा टाकला गेला आहे. मध्यरात्री दरोडा पडताच जखमी झालेल्या नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरोडा पडल्यानंतर मध्यरात्री पोलीस अधिकारी आणि कर्मचारी दाखल झाले होते. संपूर्ण घटनेचा पंचनामा देखील करण्यात आला आहे. या दरोडेखोरांच्या अटकेसाठी संपूर्ण जिल्ह्यात नाकाबंदी करण्यात आली होती. मात्र अद्यापही दरोडेखोर हाती लागले नाहीत. दरोडे टाकणारी टोळी यांच्याबाबत जखमींकडून माहिती घेतली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून अद्यावयत यंत्र-सामुग्री वापरुन सशस्त्र दरोडा टाकण्याच्या आणि चोरीच्या घटना समोर येत आहे. दरोडेखोर किंवा चोर हे हत्यारबंदी असल्याने नागरिक त्यांना प्रतिकार करणे टाळत आपल्याकडील सोने झ पैसे हे देऊन जीव वाचवतात. पोलीसांच्या आसपासच या दरोडेखोरांचा वावर असतो की काय अशीही शंका नागरिक उपस्थित करतात, त्याचे कारण म्हणजे भरवस्तीत दरोडे आणि चोरीच्या घटना घडत आहे. नाशिकच्या इगतपुरी येथील घटना देखील अशाच स्वरूपाची आहे, मध्यरात्री झालेले दोन दरोडे हे नागरिकांमध्ये खळबळ उडवून देणारे आहे. ठिकठिकाणी जिल्ह्याच्या हद्दीवर असणारे पोलीस नाकाबंदी दरम्यान काय करतात असाही सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. इगतपुरी तालुक्यातील ही घटना, नाशिकच्या ग्रामीण पोलीसांसमोर दरोडयाचे एक मोठे निर्माण झाले असून पोलीसांच्या कारवाईकडे लक्ष लागून आहे.



## मद्यधुंद प्रेयसीचा हॉटेलपासून रुग्णालयापर्यंत तमाशा; प्रियकरांचं नेमकं काय व कुठे चुकले ?

उत्तर प्रदेश : प्रेमामध्ये सुरुवातीच्या ठराविक काळापर्यंत चांगला गोडवा असतो. प्रेम जसेजसे जुने होते, तसतसे नात्यामध्ये कटुता येते. प्रत्येक प्रेमसंबंधांमध्ये असा कटू अनुभव नसेलही. पण बहुतांश प्रेमसंबंधांमध्ये याची प्रचिती येते. अशाच एका घटनेत प्रेयसीने मद्यधुंद होत प्रियकराविरोधात एका हॉटेलमध्ये प्रचंड राडा घातला. क्षुल्लक कारणावरून झालेला वाद रक्तरंजित बनला. प्रेयसीचा हात रक्तबंबाळ झाला. त्यामुळे तिला वेळीच वैद्यकीय उपचार देण्यासाठी हॉटेलपासून रुग्णालयापर्यंत धावाधाव झाली.

विशेष म्हणजे रुग्णालयात गेल्यानंतरही तिने प्रियकराला धक्काबुक्की केली. त्यामुळे मद्यधुंद प्रेयसीचा हा तमाशा सध्या सोशल मीडियातही बराच व्हायरल झाला आहे.

अलीगडच्या ठाणा गांधी परिसरातील रोडवेज बस स्टॉप जवळील रुबी हॉटेलमध्ये मध्यरात्री प्रेयसीने धिंगाणा घातला. तिने प्रियकरासमोरच आपल्या हाताची नस कापली. प्रियकराने प्रेयसीकडून अशा प्रकारचा



धिंगाणा घातला जाईल, अशी कधी स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

छोट्याशा कारणावरून वाद झाला आणि मद्यधुंद प्रेयसी भलतीच चवताळली. मध्यरात्र झालीय याचा विचार न करताच तिने धिंगाणा घालत अख्खं हॉटेल डोक्यावर घेतले. ही महिला मूळची इंदूर येथील रहिवासी आहे. ती हॉटेलमध्ये आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी आली होती.

दोघांनीही मद्यप्राशन केले होते. सुरुवातीला प्रेमाच्या आणाभाका झाल्या मात्र नंतर दोघांमध्ये भांडण सुरू झाले. हे भांडण काही क्षणांतच चांगलेच भडकले आणि मद्यधुंद प्रेयसीने आपल्या हाताची नस कापून घेतली.

प्रियकरासोबत वाद झाल्यानंतर मद्यधुंद प्रेयसी जोरजोरात ओरडतच हॉटेलच्या रूममधून बाहेर पडली होती. दोघांमधील भांडण टोकाला गेल्याने हॉटेल कर्मचा-यांनी तातडीने पोलिसांना खबर दिली. त्यानुसार पोलिसांनी हॉटेलमध्ये धाव घेतली आणि जखमी प्रेयसीला मलखान सिंह जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिचा प्रियकरही सोबत होता.

# वाळा - '5' मार्गांनी मदत करणारी आयुर्वेदीक वनस्पती !

**डीहायड्रेशन,** पित्त, उष्माघात असे त्रास वाढत आहेत. अशावेळी शरीराला थंडावा मिळावा म्हणून एसीत राहणं, विकतची सॉफ्ट ड्रिंक्स पिणं अशा गोष्टींची मदत घेतली जाते. मात्र हे पर्याय खर्चिक आणि कालांतराने शरीराला अपायकारक ठरतात. म्हणूनच यंदाच्या उन्हाळ्यात थंडगार राहण्यासाठी काही आयुर्वेदिक आणि नैसर्गिक मागार्चा वापर करून पहा. उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी हमखास फायदेशीर ठरणारी एक वनस्पती म्हणजे 'वाळा'. सुकलेल्या गवताप्रमाणे दिसणारा वाळा उन्हाळ्यात फारच उपयुक्त ठरतो. मग या आयुर्वेदिक वनस्पतीचा वापर करून उन्हाळा कसा सुस' होऊ शकतो याबाबत आयुवेर्दीक वैद्य डॉ. परीक्षित शेवडे ( आयुर्वेद MD ) यांनी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.

डॉ. शेवडे यांच्या सल्ल्यानुसार, वाळा ही एकमेव अशी वनस्पती आहे. जी थंड स्वरूपाची असली तरीही उन्हाळ्यात मंदावलेल्या पचनशक्तीला चालना देण्यासाठी मदत करते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात 'कूल' राहण्यासाठी विविध स्वरूपात वाळ्याचा समावेश करता येतो.

1) पाण्याच्या भांड्यात वाळा घाला - उन्हाळ्यात फ्रीजचं पाणी पिणं हा उपाय तात्पुरता फायदेशीर वाटत असला तरीही आरोग्यासाठी अशाप्रकारचे पाणी पिणं त्रासदायक ठरू शकते. म्हणूनच फ्रीजऐवजी माठात पाणी भरून ते प्यावे. माठांत किंवा इतर भांड्यात पाणी भरून ठेवले असेल तर ते नैसर्गिकरित्या थंड करण्यासाठी त्यामध्ये वाळ्याची जुडी घालून ठेवा.

मात्र पाण्यात वाळा घालून ठेवण्यापूर्वी त्याला बांधलेली साधी दोरी कापून केवळ वाळा पाण्यात मिसळा. साधा दोरा फार काळ पाण्यात राहिल्यास त्यावर बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता असते. पण वाळा पाण्यात सडत नाही. सुरक्षेचा उपाय म्हणून दर 15 दिवसांनी वाळा पाण्यातून काढून उन्हात वाळवून पुन्हा वापरू शकता. अशाप्रकारे एक वाळ्याची जुडी सुमारे महिना, दीड महिना वापरणे अगदीच सुरक्षित आहे.





2) वाळ्याचा लेप - उन्हाळ्याच्या दिवसात शरीरात पित्त वाढण्याची शक्यता दाट असते. अशावेळेस शरीरावर चंदनाची उटी किंवा वाळ्याचा लेप लावणं फायदेशीर ठरते. त्यामुळे शरीरात थंडावा राहण्यास मदत होते.

3) वाळ्याचं सरबत - उन्हाळ्याच्या दिवसात सतत घाम येत असल्याने शरीरातील क्षार आणि पाण्याचे प्रमाण कमी होते. अशावेळी सतत लागणारी तहान शमवण्यासाठी वाळ्याचं सरबत फायदेशीर ठरतं. यामुळे उन्हाचा त्रास कमी होतो तसेच शरीरात उर्जा टिकून राहण्यास मदत होते. वाळ्याचं सरबत किंवा वाळ्याचं चूर्ण पाण्यात मिसळून ते सकाळी नाश्त्यानंतर प्यायल्यास उन्हाळ्याच्या दिवसात ते एनर्जी ड्रिंकप्रमाणे कमाल करू शकते.मंदावलेली पचनशक्ती सुधारून, उन्हाळ्याच्या दिवसातील मरगळ झटकण्यास मदत होते. या '5' घरगुती आणि हेल्दी सरबतांनी उन्हाळ्यात रहा कूल !

4) वाळ्याच्या टोप्या - तीव्र सूर्यकिरणांचा त्रास झाल्यास हीटस्ट्रोक / उष्माघाताचा त्रास होतो. अशावेळेस उन्हांत कामानिमित्त बाहेर पडणार असाल तर वाळ्याच्या टोप्या घालून बाहेर पडणं अधिक सुरक्षित ठरेल.नक्की वाचा

5) वाळ्याचे पडदे / पंखे - वाळ्याचे पडदे आणि पंखे हे उन्हाळ्यात नैसर्गिक स्वरूपातील एअर कंडिशनप्रमाणे काम करतात. प्रामुख्याने विदर्भात उन्हाळ्याच्या दिवसात वाळ्याचे पडदे किंवा पंखे वापरले जातात. त्यावर पाणी मारल्यानंतर पड्द्यांना छेदून येणारी हवा थंडगार असते. त्यामुळे उन्हाळ्यात घरात थंडावा निर्माण करणारा हा इको फ्रेंडली पर्यायही नक्की आजमावून पहा.

# एरंडेल तेल- गुडघे दुखीवर रामबाण उपाय

**जसजसे** तुम्ही उतारवयात येता, तशा शरीराच्या व्याधीही वाढतात. मात्र आजकाल सर्वाच वयोगटात दिसणारा एक आजार म्हणजे 'सांधेदुखी'. बरेच जण गुडघेदुखीचे प्रमाण प्रचंड स्वरुपात वाढले की उपायांसाठी धावाधाव करतात. त्यावेळी गोळ्या आणि काही वेदनाशामक क्रिम्स



वापरणे केवळ हेच मार्ग राहतात. मात्र नैसर्गिक उपायांनी गुडघेदुखी कमी करण्यासाठी 'एरंडेल तेलाचा' वापर करा. ( केसांच्या समस्या दूर करण्यासाठी एरंडेल तेल कसे उपयोगी आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे का? )

एरंडेल तेल खरंच गुणकारी आहे का ?

गुडघेदुखी हे संधीवाताचे एक प्रमुख लक्षण आहे. एरंडेल तेलातील वेदनाशामक गुण गुडघेदुखी कमी करण्यास मदत करतात. एरंडेल तेलामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्तीला चालना मिळते व अॅन्टीबॉडीज तयार होऊन वेदना कमी होतात. तसेच त्वचेत एरंडेल तेल सतत झिरपल्याने स्नायूंना आलेली सूज व नसा मोकळ्या होतात.

गुडघेदुखीवर उपाय

झटपट आराम मिळवण्यासाठी, दुखणाया गुडघ्यांवर गरम ऑलिव्ह ऑईलने मसाज करावा. तसेच गरम पाण्याचा शेक दिल्यानेही वेदना कमी होतात. तुम्हाला सांधेदुखीचा त्रास असेल तर हा उपाय आठवड्यातून दोनदा करावा.

सांधिवातावर उपाय

रात्रभर एरंडेल तेलात भिजवलेला सुती रुमाल, गुडघ्यावर ठेवा. मात्र रुमालातील अतिरिक्त तेल पिळून काढा. त्यानंतर गरम पाण्याच्या पिवशीचा शेक देऊन तासभर रुमाल गुडघ्यांवरच ठेवा. दर 15 दिवसांनी हा उपाय करा.

# पानासोबत खा तुळशीच्या बिया:इम्युनिटी बूस्ट होईल, डायजेशन सुधारेल, सदीर्पासून मिळेल आराम




जे लोक पान खाण्याचे शौकीन आहेत ते सुपारी, कात आणि चुना मिसळून खातात. हे आरोग्यासाठी खूप हानिकारक मानले जाते, परंतु असे म्हणतात की प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे पान खाण्याचे अनेक फायदे आहेत, परंतु याचे सेवन कात-चुना टाकून न करता तुळशीच्या बिया टाकून करणे फायदेशीर ठरते.

विड्याची पाने थोडी कडवट, तुरट असली तरी आरोग्यासाठी कोणत्याही औषधापेक्षा कमी नाहीत. अनेक रोगांचे औषध म्हणजे एक विड्याचे पान. बहुतेक पान प्रेमींना चुना, सुपारी, कात मिसळून पान खायला आवडते. पण तुम्ही कधी तुळशीच्या बिया टाकून पान खाल्ले आहे का? होय, कात आणि चुना टाकून पान खाणे फायदेशीर नसेल परंतु तुळशीच्या बिया टाकून पान खाणे फायदेशीर ठरू शकते.

दिल्लीच्या पंचकर्म रुग्णालयाचे आयुर्वेदाचार्य डॉ. आर. पी. पराशर यांच्यानुसार विड्याची पाने आणि तुळशीच्या बिया एकत्र खाल्ल्याने पचनसंस्था निरोगी राहते. यासोबतच हिरड्या आणि दातांच्या समस्येपासूनही आराम मिळतो. याशिवाय अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो.

विड्याची पाने आणि तुळशीच्या बियांचे फायदे

पानामुळे सुजलेल्या हिरड्या, तोंडाची दुर्गंधी दूर होते. याशिवाय अनेक समस्या दूर करू शकतात. चला त्याबद्दल जाणून घेऊया-

तोंडाचे आरोग्य-

विड्याच्या पानांमध्ये श्वासाची दुर्गंधी कमी करण्याचा गुणधर्म असतो. वास्तविक, त्यात असलेले घटक बॅक्टेरियाचा प्रभाव कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, ज्यामुळे तोंडातून येणारा दुर्गंध कमी होऊ शकतो. तोंडातून दुर्गंधी येणे किंवा तोंडातून रक्त येण्याची समस्या असल्यास १ महिना तुळशीच्या बियांसोबत विड्याचे पान चघळावे. तुम्हाला हवे असल्यास त्यात लवंग आणि वेलचीही टाकू शकता. यामुळे तोंडाची दुर्गंधी दूर होईल.

रोगप्रतिकारशक्ती वाढते-

विड्याची पाने आणि तुळशीच्या बिया रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रभावी ठरू शकतात. यामध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. याद्वारे अनेक सामान्य आजार बरे होऊ शकतात. विड्याची पाने शारीरिक क्षमता सुधारू शकतात. हे शुक्राणूंची संख्या आणि गुणवत्ता सुधारू शकते. जर तुम्हाला शारीरिकदृष्ट्या कमजोर वाटत असेल तर तुमच्या रोजच्या आहारात विड्याची पाने आणि तुळशीच्या बियांचा समावेश करा.

डायजेशन सुधारते- तुळशीच्या बिया विड्याच्या पानांसह खाल्ल्याने पचनक्रिया मजबूत होते. वास्तविक, तुळशीच्या बिया पानांसह खाणे तुमच्या लाळ ग्रंथी सक्रिय ठेवण्यास उपयुक्त ठरू शकते. ही ग्रंथी अन्नाचे लहान तुकडे करण्याचे काम करते, ज्यामुळे बद्धकोष्ठता, अपचन आणि गॅसच्या समस्या दूर होतात. याशिवाय गॅस्ट्रिक अल्सरपासून मुक्ती मिळण्यास मदत होते.हिरड्यांची सूज

विड्याची पाने आणि तुळशीच्या बिया हिरड्यांची सूज आणि जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी ठरतात. यामध्ये असलेले दाहक-विरोधी गुणधर्म सूज कमी करू शकतात. हिरड्या सुजल्या असतील तर रोज तुळशीच्या बिया सोबत विड्याचे पान चावून खावे. विड्याची पाने आणि तुळशीच्या बिया आरोग्याच्या अनेक समस्या दूर करू शकतात. याच्या सेवनाने तुम्हाला खूप फायदा होईल, पण हे लक्षात ठेवा की तुम्हाला आधीच कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास, तज्ञांचा सल्ला घेतल्यानंतर त्यांचे सेवन करा.

विड्याची पाने आणि तुळशीच्या बिया एकत्र सेवन केल्याने शरीराला अनेक आश्चर्यकारक फायदे मिळतात. चला जाणून घेऊया त्याचे फायदे...

बद्धकोष्ठतेपासून मुक्ती

विड्याच्या पानांसह तुळशीचे सेवन केल्याने पचनक्रिया मजबूत होते आणि पोटाच्या समस्या कमी होतात. विड्याच्या पानांसोबत तुळशीच्या बियांचे सेवन केल्याने गॅसची समस्या दूर होते.

डोकेदुखीत आराम

जर तुम्ही डोकेदुखीच्या समस्येचा सामना करत असाल तर विड्याची पाने तुमच्यासाठी फायदेशीर ठरतील. विड्याचे पाने मध आणि तुळशीच्या बियांमध्ये मिसळून घेतल्यास डोकेदुखीमध्ये आराम मिळतो.

असे सेवन करा

याचे सेवन करण्यासाठी रोज तुळशीच्या बिया सोबत विड्याचे पान चघळावे किंवा तुळशीच्या बिया आणि विड्याचे पान पाण्यात भिजवून दोन-तीन तासांनी हे पाणी प्यावे. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या दूर होऊ शकतात.

# ओठांच्या बदलत्या रंगावरुन जाणून घ्या आरोग्य स्थिती:लाल, गुलाबी, पांढऱ्या, काळ्या ओठांमध्ये दडलेली आरोग्याची रहस्ये

ओठांचा रंग शरीरात होणारी क्रिया दर्शवू शकतो. जसे की रक्त पातळी, बॉडी फंक्शन एवढेच नाही तर टेम्प्रेचरही सांगतो. ओठांच्या रंगात अचानक बदल होत असेल तर चकूनही त्याकडे दुर्लक्ष करू नका. मेरठ मेडिकल कॉलेजच्या स्किन डिपार्टमेंटचे एचओडी डॉ. अमरजीत सिंह यांच्याकडून जाणून घेऊया, ओठांचा रंग आरोग्याची स्थिती कशी सांगतो....




ओठांच्या रंगाचा इशारा

प्रत्येकाच्या ओठांचा रंग जन्मापासून वेग-वेगळा असतो. पण जर तुम्हाला ओठांच्या रंगात सामान्य रंगाव्यतिरिक्त बदल दिसू लागला तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. हे आरोग्याशी संबंधित अनेक संकेत असू शकतात.

गुलाबी किंवा पांढरे ओठ

ओठ हलके गुलाबी, पांढरे किंवा राखाडी झाले तर दोन्ही हात आणि पायांना थंडी जाणवते. फिकट गुलाबी, पांढरे किंवा राखाडी ओठ हे अशक्तपणाचे लक्षण असू शकतात, म्हणजे शरीरात रक्ताची कमतरता. अशी लक्षणे दिसल्यास लोहयुक्त पदार्थ जसे हिरव्या भाज्या, खजूर आहारात घ्याव्यात.

लाल किंवा काळे ओठ

चेन स्मोकिंगमुळे ओठांचा रंग गडद लाल किंवा काळा होतो. पण, धुम्रपान करत नसाल आणि तरीही ओठ गडद लाल किंवा काळे असतील तर याचा अर्थ पचनसंस्था नीट काम करत नाही. अशा स्थितीत जुलाब, आम्लपित्त किंवा बद्धकोष्ठतेची समस्या जाणवू शकते. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी चिकन, दूध, अंडी किंवा दही असा प्रथिनयुक्त आहार घेणे आवश्यक आहे.

ओठ लाल होणे

लाल ओठ असणे चांगले मानले जाते. पण, अचानक ओठ लाल होणे यकृत समस्या सूचित करतात. अशा स्थितीत पुन्हा पुन्हा खाण्याची इच्छाही होऊ शकते. त्यामुळे वजनही वाढू शकते. म्हणून, समस्येच्या सुरूवातीस डॉक्टरांशी संपर्क साधणे चांगले आहे.

ओठांचा रंग पिवळा

रक्तातील बिलीरुबिनचे प्रमाण वाढल्यामुळे ओठांचा रंग पिवळा होतो. यकृताशी संबंधित कोणतीही समस्या असली किंवा ती नीट काम करत नसेल तरीही असे होते. काही प्रकारच्या विषाणूजन्य संसर्गामुळेही ओठांचा रंग पिवळा होतो.

निळे ओठ

रक्तातील ऑक्सिजनची कमतरता आणि फुप्फुस किंवा हृदयाच्या कामात अडथळा निर्माण झाल्यामुळे कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण जास्त झाल्याने ओठ निळे पडतात. ओठ अचानक निळे पडणे ही देखील आपत्कालीन परिस्थिती आहे. जर बाळ जन्मानंतर लगेच रडले नाही तर ते फुप्फुसांच्या अयोग्य कार्यामुळे होते.

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
## COMPUTER DEPARTMENT

Indira Gandhi Bhavan, Chattrapati Shivaji Maharaj Marg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

MBMC/COMPUTER/384 /2022-23 Date: - 13/10/2022

### // Tender Notice //

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders for following works. The tenders form and other relevant document will be available for download on MBMC E-Tendering website as https://mahatenders.gov.in from dt. 14/10/2022 to dt. 20/10/2022 till 1.00 p.m. Tender form fee and EMD should be submitted through online Receipt system, failing which the tender will be disqualified.

The last date for submission of tenders computed in all respects on dt. 20/10/2022 up to 1.00 p.m. in the above mentioned website. If possible the tenders shall be opened in the presence of their bidders or, there representative on the dt. 21/10/2022 up to 5.30 p.m. at the Tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all online bids, without assigning any reasons.

| Sr. No. | Name of work | Estimated Amount in Rs. (Yearly) | Cost of Tender Documents (in Rs.) | Earnest Money Deposit (EMD) |
|---|---|---|---|---|
| 1) | To provide internet to Mira Bhaindar Municipal Corporation Offices for one year | Rs.24,07,970/- (Yearly) | Rs. 4,500/-+ Rs.810/- (18% GST) = Rs.5,310/- (Non Refundable) | Rs. 75,000 /- (Refundable) |

Note :-

1. Tender Documents shall not be sent or received via post.
2. Tender Submission is online only.
3. EMD and Document fees shall be submitted though online receipt system available on e-tendering website.

Ref.: MBMC / PRO / 299 / 2022-23
Date : 13 / 10 / 2022

Sign/-
(R.M.Gharat)
System Manager
Mira Bhainder Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार १८ ते २४ ऑक्टोबर - २०२२

संपादकीय...



# हम करे सो कायदा

सुप्रशासन अर्थात गव्हर्नन्स हा शब्द भारतातच नव्हे तर जगभर सध्या परवलीचा आणि आकर्षणाचा झाला आहे. परंतु या संकल्पनेच्या नेमक्या अर्थाविषयी अनेकांच्या मनात संभ्रम असतो. कार्यक्षमता, कामाचा वेग म्हणजे सुप्रशासन असे अनेकांना वाटते. त्यामुळे योजना आखणे आणि त्यांची धडाक्याने अंमलबजावणी करणे एवढ्यापुरतीच चांगल्या प्रशासनाबद्दलची कल्पना मर्यादित राहते. कार्यक्षमता हा भाग महत्त्वाचा आहे, यात शंका नाही. परंतु नियम-कायदेकानूंच्या चौकटीत चालणारा सुविहीत कारभार सुप्रशासनात अभिप्रेत असतो. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा जर व्यवस्थेने स्वीकारलेली घटना-कायद्याची चौकट मोडत असतील तर हे कसले सुप्रशासन? अलीकडे विविध क्षेत्रांत हा प्रश्न उपस्थित होतो आहे.

माहिती-तंत्रज्ञान कायद्यातील '६६-अ' हे कलम घटनाबाह्य असल्याचा स्पष्ट निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही विविध राज्यांतील पोलिस अद्यापही त्या कलमाच्या आधारे आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करीत आहेत, हे या अनिष्ट प्रवृत्तीचे ताजे आणि ठळक उदाहरण. या कलमानुसार माहितीच्या महाजालात आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्याला, प्रसारित करणाऱ्याला तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा आहे. शिक्षेची ही तरतूद लक्षात घेतली तर या विषयाचे गांभीर्य कळते. आपली व्यवस्था लोकशाहीची आहे. पोलिसी राज्य नव्हे. असे असूनही सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नसेल तर ती गंभीरच बाब आहे.

आपल्याला न्याय मिळावा किंवा एखादा सार्वजनिक हिताचा प्रश्न धसास लागावा म्हणून लोक न्यायालयात धाव घेतात. अन्य सर्व यंत्रणांकडून धुडकावले गेल्यानंतर न्यायासाठी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याची संधी असते, असे नेहेमीच सांगितले जाते. पण या प्रकरणात जे काही घडले आहे, ते विपरीतच म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाने न्याय दिल्यानंतरही 'तुम्ही दिलेल्या निवाड्याची अंमलबजावणी होत नाही, ती करण्याचे आदेश द्या', यासाठी पुन्हा संबंधितांना 'कोर्टाची पायरी' चढावी लागली! हा सर्व प्रकारच धक्कादायक आणि प्रश्नांचे मोहोळ उठविणारा आहे. मानवी हक्कांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या 'लोकस्वतंत्रता संघटने'ने (पीयूसीएल) या प्रश्नाचा पाठपुरावा केला. गेल्या वर्षीही संघटनेने ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती आणि त्यावेळीही न्यायाधीशांनी या विषयावर संताप व्यक्त केला होता. ६६-अ हे कलम घटनाबाह्य असल्याचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला, त्याला सात वर्षे उलटून गेल्यानंतरही त्याची अंमलबजावणी न होणे हे व्यवस्थेच्या आजारपणाचे लक्षण नव्हे काय? तिची सगळी चक्रे नीट चालत नाहीत, असा त्यांचा अर्थ आहे. आता सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सर्व राज्यांतील गृहसचिव, पोलिस महासंचालक यांना ६६-अ कलमाचा वापर थांबविण्याच्या सूचना पोलिस दलांना द्याव्यात, असा सक्त आदेश दिला आहे.

समाज माध्यमे सर्वांच्याच हातात आल्यानंतर प्रत्येकाला त्यावर अभिव्यक्तीची मोकळीक मिळाली आहे. भारतासारख्या बहुविध, बहुस्तरीय समाजांत अशा प्रकारच्या अनिर्बंध स्वातंत्र्यामुळे समाजस्वास्थ्याला तडा जाऊ शकतो, असा युक्तिवाद ते कलम जारी करताना केला गेला होता. समाजस्वास्थ्याला बाधा आणणाऱ्या गोष्टींना अटकाव केला पाहिजे, याविषयी मतभेद होणार नाहीत. परंतु त्यासाठी उपाय योजताना लोकशाहीत अभिप्रेत असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी तर होत नाही ना, हेही पाहावे लागते. किंबहुना पाहिलेच पाहिजे. पोलिसांकडे जर अनिर्बंध अधिकार असले तर तसे होण्याचा धोका जास्त असतो. याचा प्रत्यय देशात अनेक घटनांमध्ये आलेला आहे. त्यामुळेच पहिल्यांदा जेव्हा 'पीयूसीएल'ने '६६-अ'चा वापर अद्यापही चालूच आहे, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले; तेव्हा केंद्र सरकारने यात आपला संबंध नसल्याचे सांगितले. पोलिस दलांचा कारभार हा राज्य सरकारांच्या अखत्यारीत आहे, अशी भूमिका घेतली होती. परंतु न्यायालयाने त्यावेळी ६६-ए अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांची माहिती केंद्र सरकारने गोळा करावी, असा आदेश दिला होता. आता विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी पाठविलेली माहिती केंद्र सरकारने संकलित करून न्यायालयाला सादर केली आहे.

• • •

# समाजमाध्यमांवर नियंत्रण हवं खरं, पण ते कुणाचं?

लोकशाही समाजात उच्चारस्वातंत्र्य किंवा अभिव्यक्तीस्वातंत्र्य हे मतप्रवाहांच्या जडणघडणीसाठी पायाभूत असते. उच्चारस्वातंत्र्य किंवा अभिव्यक्तीस्वातंत्र्य कोणाच्या नियंत्रणाखाली आहे- कोणत्या भाषणाला/ कोणते विचार मांडण्याला परवानगी आहे, का ेणत्या प्रकारच्या विचारांना परवानगी नाही, प्रचार कशाचा होतो आहे आणि कुणाला परावृत्त केले जाते आहे, या साऱ्याला राजकीय स्पर्धेचे आणि सामाजिक घुसळणीचे कंगोरे आहेत. आपण इथे या लेखात चर्चा करणार आहोत ती फक्त 'ऑनलाइन' उच्चारस्वातंत्र्यांची- समाजमाध्यमांच्या आणि बहुतेकदा मोबाइलवरून होणारी संदेशांची देवाणघेवाण किंवा 'फॉरवर्ड्स' यांच्या प्रशासनासाठी सरकारपुढे दोन प्रस्ताव आहेत, त्यांची. यापैकी पहिला प्रस्ताव सरकार-नियुक्त तक्रार अपील समित्यांकडे (ग्रीव्हन्स अपीलेट कमिटी - लघुरूप 'जीएसी') नियंत्रण आणि दुसरा प्रस्ताव - समाजमाध्यम कंपन्यांनी मिळून (म्हणजे अख्ख्या उद्योगाने) स्वयं नियामक संस्था (सेल्फ रेग्युलेटरी बॉडी - 'एसआरबी') स्थापन करण्याचा.

यापैकी पहिला प्रस्ताव सरकारकडे एकतर्फी नियंत्रण देणारा आहे असेच कुणालाही वाटेल, पण दुसरा प्रस्तावसुद्धा उद्योगाचा जो काही अजेंडा असेल त्याच्या दावणीला ही सामाजिक घुसळण बांधून टाकणारा ठरू शकतो.

'जीएसी' नको आणि 'एसआरबी'सुद्धा नको, असे का?

केंद्र सरकारच्या 'इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालया'ने प्रसृत केलेल्या मसुद्यानुसार, 'जीएसी' या समितीची स्थापना केंद्र सरकारद्वारेच होईल आणि विविध समाजमाध्यमांच्या निर्णयांविरुद्ध ही 'जीएसी' अपीलीय संस्था म्हणून काम करेल. हे सरकारी नियंत्रण आहे. इथे सरकार केवळ निषिद्ध संदेश कोणते ठरतील याची रूपरेषा असणाऱ्या ठोस धोरणानुसारच काम करेल असे नाही, तर सरकारला सामग्रीच्या वैयक्तिक भागांवर आणि/किंवा वापरकर्त्यांवर अत्यंत व्यक्तिनिष्ठ निकष लागू करण्याचा अधिकार हवा आहे. अनेकांना आठवत असेल की, सरकारने या अधिकाराचे सूतोवाच तर केलेले आहे... म्हणूनच फेसबुक, ट्विटर किंवा व्हॉट्सअॅपवरून विशिष्ट संदेश काढून टाकण्यासाठी किंवा अवरोधित करण्यासाठी समाजमाध्यमांवर नियमितपणे आदेश (कारण न सांगता) काढले जातात . पण 'जीएसी' कडे अधिकार येतील तेव्हा प्रश्न असेल तो ट्विटर किंवा व्हॉट्सअॅप यांनी स्वतःच




सक्रियपणे अवरोधित केलेली संदेश किंवा 'ब्लॉक' केलेले एखाद्याचे खाते पुनर्स्थापित करण्यासाठी एका सरकारनियुक्त समितीने निवाडा देण्याचा. म्हणजे इथे काही केवळ राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक आदेशाचे तर्क लागू होत नाहीत आणि 'जीएसी'चा छुपा हेतू सत्ताधारी पक्षाच्या यंत्रणेसाठी राबणे हासुद्धा असल्याचे दिसल्यास नवल नाही. अनेक वापरकर्त्यांनी ज्याच्या विखारी संदेशांवर आक्षेप घेतला आणि म्हणून जे संदेश समाजमाध्यमाच्या कंपनीनेच हटवले असतील, ते 'पुन्हा जसेच्या तसे दिसू द्या' हे कुणाबाबत सांगितले जाणार आणि कुणाबाबत नाही, याचा अंदाज इथे अनेकांना सहज बांधता येईल. हे स्पष्ट आहे की 'जीएसी' लोकशाही वैधतेच्या किमान मानकांची पूर्तता करत नाही आणि म्हणून 'जीएसी' हा मार्ग नव्हे.

दुसरीकडे, समाजमाध्यम उद्योगाच्या 'एसआरबी' प्रस्तावालाही लोकशाही वैधता नाही. मुळात सारी समाजमाध्यमे नफ्याच्या हेतूने चालवली जात असतात, हे वारंवार दिसून येते आणि हे नफ्याचे हेतू अनेकदा 'सार्वजनिक हिता'च्या विसंगत असतात. 'माहिती आदानप्रदान सेवा' हे आपले स्वरूप ठेवण्याऐवजी 'हिट्स' वाढवण्यासाठी, जास्तीत जास्त लोक जास्तीत जास्त वेळ कसा आपल्याचकडे घालवतील याच एका हेतूने सामान्यतः चुकीची माहिती आणि द्वेषयुक्त भाषणावर भर दिला जातो, तेच वापरकर्त्यांपर्यंत 'यू मे ऑल्सो लाइक' वगैरे बहाण्यांनी पोहोचवले जाते; आणि विशेषतः भारतात, जेथे अमेरिकी समाजमाध्यम कंपन्या त्यांच्या देशाच्या तुलनेत त्यांच्या स्वतःच्या मानकांची अंमलबजावणी करण्यामध्ये हयगय करत असल्याचे अनेकदा दिसून आलेले आहे, तिथे तर असा या उद्योगातील सर्व कंपन्यांनी मिळून अधिकार दिलेल्या 'एसआरबी'चा प्रस्ताव अधिकच कुचकामी ठरेल... ही 'एसआरबी' लोकांसाठी आणि लोकशाहीसाठी पुरेशा जोरकसपणे काम न करता, उद्योग आणि बड्या कंपन्यांचे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करेल.

'एसआरबी'ला नावापुरते अधिकार?

केंद्र सरकारविरुद्ध ट्विटरने मध्यंतरी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका गुदरली होती आणि सरकार आपल्याला कधीही, कोणताही संदेश काढून टाकण्यासाठी कसे भाग पाडते असा सूर लावला होता. पण एकंदर समाजमाध्यमांना लोकशाहीची फार चाड आहे असे तरी कोण म्हणू शकेल? सरकारी दबावाचा प्रतिकार करण्याबाबत तर समाजमाध्यम कंपन्यांचा भारतातील उत्साह नगण्यच असतो हेही वारंवार दिसले आहे. उदाहरणार्थ, ट्विटरच्या एका माजी सुरक्षा प्रमुखाने अमेरिकी नियामकांना सांगितले की, केंद्र सरकारच्या मर्जीनुसार एका सरकारी एजंटला आमच्याकडे कामावर ठेवून वेतन देण्यासाठी आमच्यावर दबाव आला आहे. इथवर मजल गेली असेल तर, गुप्त सरकारी दबावाला अधिकृतताच प्रदान करणारा रबरी शिक्का म्हणून या 'एसआरबी'चा वापर होऊ शकतो. 'एसआरबी'चे आदेश सर्वांवर बंधनकारक असतील असे एकदा ठरले की, सरकारला एकेकट्या समाजमाध्यम-कंपनीवर दबाव आणण्यापेक्षा एकट्या 'एसआरबी'वर दबाव आणणे फारच सोपे. बरे, आदेश बंधनकारक नसतील म्हणावे तर दुसरी खरी शक्यता अशी आहे की 'एसआरबी'सारखी संस्था ही मिळमिळीत असेल, अंतर्गत मतभेदांमुळे किंवा काही अधिकारच कमी असल्याने तिला कुणी जुमानणार नाही आणि त्यामुळे मग सरकारी 'जीएससी' साठी मार्ग मोकळा होईल. जरी हा 'एसआरबी'चा प्रस्ताव स्वतः संयुक्त उद्योग आघाडीने- म्हणजे ' आयएमएआयए'नेच मांडला होता हे खरे असले तरी, ही 'मिळमिळीत' पणाची शक्यता समाजमाध्यम कंपन्यांमधल्या काही जणांनी व्यक्त केलेली आहे.

अधिकार 'सरकारकडे' नाही...

हे स्पष्ट आहे की दोन्हीपैकी कोणताही प्रस्ताव लोकशाही वैधतेच्या किमान मानकांची पूर्तता करत नाही आणि त्यावर पुनर्विचार करण्याची गरज आहे. लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य केंद्रस्थानी मानले पाहिजे हे लक्षात घेता, कोणत्याही सरकारी किंवा खासगी संस्थेला स्वीकारार्ह संदेशांच्या रूपरेषेबाबत निर्णय घेण्याचा अनिर्बंध अधिकार असू शकत नाही. निवडून आलेल्या सरकारने इतर धोरणात्मक निर्णयांप्रमाणे 'संदेशांची मानके ठरवण्याचा' कार्यकारी अधिकार मिळवला आहे, हा युक्तिवादच मुळात चुकीचा आहे- कारण संदेश- त्यामागले उच्चारस्वातंत्र्य- हाच सरकारशी लढण्याचा एकमेव लोकशाही मार्ग आहे. अशा प्रकारे मानके ठरवणे आणि अंमलबजावणी करणे - म्हणजेच संदेशांचे नियंत्रण करणे- हे सरकारच्या कक्षेबाहेर असणेच आवश्यक आहे.मग पर्याय काय?पर्याय आहे, तो संसदेला उत्तरदायी असलेल्या वैधानिक नियामकाची स्थापना करण्याचा. मात्र तशा यंत्रणेचे कामकाज सुरू होण्याआधी, सरकार निव्वळ आदेश देते आणि संदेशांच्या नियंत्रणाचे निर्णय ज्या पद्धतीने घेतले जातात, त्यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. हे आदेश अनेकदा गुप्त असतात, त्यामुळे सरकारी निर्णयांची छाननी करणे अशक्य होते.

शेवटी, समाजमाध्यमांची व्यापक मोठी भूमिका आणि लोकशाही समाजांवर त्यांचा प्रभाव याबद्दल धोरणकर्त्यांपर्यंत जाणारी चर्चा घडवून करणे महत्त्वाचे आहे. सध्याचे प्रस्ताव एकेकट्या वापरकर्त्यांच्या संदेशांवर दंडेली करण्यात व्यस्त आहेत. समाजमाध्यमे आज काही विशिष्ट आवाज वाढवण्यात अधिकाधिक हस्तक्षेप करणारी भूमिका बजावत आहेत असे वाटत असेल, तर असे का होते आहे ते थांववण्यासाठी सर्वाधिक लोकशाहीवादी संरचना कोणती असेल, याबद्दल वाद-संवाद करणे हे कर्तव्यच आहे.

लेखिका 'फ्यूचर ऑफ इंडिया फाउंडेशन'च्या कार्यकारी संचालक असून, या फाउंडेशनने अलीकडेच समाजमाध्यमांच्या अभ्यासाअंती 'पॉलिटिक्स ऑफ डिसइन्फॉर्मेशन' हा अहवाल प्रकाशित केला आहे.

• • •

# नक्षलवाद्यांशी संबंध !

**साईबाबा** प्रकरण सध्या चर्चेत आहे. 'प्रत्यक्ष जंगलात राहून हातात बंदूक घेत सरकारविरुद्ध लढणारे, जंगलातल्याच गावांमध्ये राहून बंदूकधारी नक्षलींना सोयीसुविधा व मदत पुरवणारे, जंगलापासून दूर शहरात राहून या चळवळीच्या संपर्कात असणारे व त्यांना पाहिजे तशी मदत पुरवणारे, जंगलाबाहेर राहून नक्षलींच्या समर्थक संघटनांमध्ये निशस्त्रपणे सक्रिय भूमिका बजावणारे, या चळवळीशी थेट संबंध नसलेले पण नक्षलींच्या विचारांशी आस्था बाळगणारे, नक्षलींची हिंसा मान्य नाही, पण त्यांचा विचार लक्षात घेण्याजोगा अशी उघड भूमिका घेणारे, जंगलाबाहेर राहून नक्षलींची 'समर्थक संघटना' नावाची अधिकृत विंग सांभाळणारे व त्यासाठी त्यांना पाहिजे ती मदत गुप्तपणे पुरवणारे, अशी कृत्ये करताना आपला समाजातील चेहरा समाजसेवकाचा राहील याची काळजी घेणारे, चळवळीशी थेट संबंध नाही. पण स्वतःचा जंगल वा त्यालगतचा व्यवसाय नीट चालावा म्हणून त्यांना नियमित खंडणी देणारे. जंगलातील गावात राहायचे असल्याने नाइलाज म्हणून नक्षलींना मदत करावी लागणारेङ्क' नक्षली चळवळीचा पट इतक्या सा-यांना कवेत घेणारा. यातील कुणाचा संबंध प्रत्यक्ष तर कुणाचा अप्रत्यक्ष. अशावेळी कायदेशीर कारवाई करताना दक्षता घेणे गरजेचे. ती न घेतली तर काय होते, हे साईबाबा प्रकरणाने पोलिसांना दाखवून दिले आहे.

मुळात नक्षली चळवळ ही गनिमी पद्धतीने काम करणारी. मग ते जंगलात थेट लढले जाणारे युद्ध असो वा शहरात लोकशाहीतील आयुधांचा आधार घेत आंदोलनाच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे काम असो. यात सहभागी असलेल्या प्रत्येकाचा सहभाग तो कायद्याच्या कचाट्यात सापडणार नाही याच हेतूने निश्चित केलेला. नक्षलींनी कृतीयोजना राबवण्यासाठी तयार केलेल्या अनेक पुस्तिका व कागदपत्रांमध्ये याचा सविस्तर उल्लेख आढळतो. चळवळीसाठी काम करताना वेगवेगळी नावे धारण करणे, क्षेत्र बदलले की ती बदलणे, समर्थित संघटनांची नावेसुद्धा याच प्रकारे बदलत राहणे हे सारे डावपेच या गनिमी पद्धतीतलेच. अशा स्थितीत पोलीस यंत्रणांनी कारवाई केली तरी ठोस पुरावे गोळा करणे अवघड. साईबाबाचे प्रकरण मात्र असे नव्हते. २०१३ ला गुन्हा दाखल केल्यावर गडचिरोली पोलिसांनी सुमारे वर्षभर तपास केला. त्यातून हाती आलेल्या पुराव्याच्या आधारावरच पुढचे पाऊल उचलले.



२०१४ मध्ये गडचिरोली पोलिसांनी दिल्ली विद्यापीठातील इंग्रजीच्या या प्राध्यापकाला अटक केली. २०१७ मध्ये सत्र न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्याच्याकडून जप्त केलेली हजारो कागदपत्रे, त्याचा नक्षलींशी असलेला थेट संबंध दर्शवणारे इलेक्ट्रॉनिक पुरावे, इलेक्ट्रॉनिक गॅझेट, त्याने नक्षलींची सर्वोच्च कार्यकारिणी असलेल्या पॉलिट ब्युरोतील सदस्यांशी केलेला पत्रव्यवहार. त्यात नमूद केल्याप्रमाणे घडत गेलेल्या घटना याची संगती न्यायालयात लावली गेली व त्याचे रूपांतर शिक्षेत झाले. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मात्र त्याला निर्दोष सोडताना केवळ तांत्रिक मुद्द्याचा आधार घेतला.

बेकायदा कृत्य प्रतिबंधक कायद्यातील कलम ४५(१) अन्वये कारवाई करताना गृहखात्याची रीतसर मंजुरी घ्यावी लागते. गडचिरोली पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यावर प्रारंभी काही कलमे लावताना ती घेतली. नंतर आणखी काही कलमे वाढवताना मात्र ती घेतली नाही. त्यामुळे ही कारवाईच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणारी नाही, असे कारण देत न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा रद्द केली. उच्च न्यायालयाचा हा निकाल अनेक प्रश्न निर्माण करणारा, प्रकरणाच्या तांत्रिक मुद्यावर केंद्रित असणारा आहे. त्यामुळे गुणवत्तेच्या आधारावर हे प्रकरण तपासलेच गेले नाही या सरकारच्या दाव्याला बळ मिळतेङ्क सर्वोच्च न्यायालयाने तातडीने सुनावणी घेऊन या निर्णयाला स्थगिती देताना नेमका हाच मुद्दा विचारात घेतला. उल्लेखनीय म्हणजे सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू असताना बचाव पक्षाच्या वतीने हाच मुद्दा उपस्थित केला होता. तेव्हा न्यायालयाने या तांत्रिक बाजूकडे दुर्लक्ष करत पुराव्याचा आधार घेत शिक्षेचा निर्णय जाहीर केला होता. साईबाबाच्या प्रकरणात एकूण सहा आरोपी आहेत. त्यापैकी पाचांच्या विरुद्ध यूएपीएची कलमे लावताना रीतसर मंजुरी घेण्यात आली होती. साईबाबाच्या प्रकरणात ती घेतली गेली नाही. तरीही उच्च न्यायालयाने साईबाबासकट सर्वांनाच निर्दोष सोडून दिले. आता सर्वोच्च न्यायालयात गुणवत्तेच्या आधारावर या प्रकरणाची सुनावणी होईलही, पण घडलेल्या घटनाक्रमातून पोलिसांचा जो हलगर्जीपणा समोर आला, त्याचे काय ? राजकीय दबावामुळे अशा चुका होतात का ?

मुळात नक्षल कोण हे ठरवणे अतिशय जिकरीचे. त्याला कारण या चळवळीचे गनिमी व गुप्त स्वरूप. अशा स्थितीत कारवाई करताना प्रचंड सावधगिरी बाळगणे गरजेचे असते. योग्य व ठोस पुरावे हाती असल्याशिवाय पुढाकार घ्यायचा नसतो. विशेषतः शहरी भागात या चळवळीसाठी काम करणा-यांच्या संदर्भात हे महत्त्वाचे ठरते. नक्षलींच्या हिंसाचाराला प्रत्युत्तर देणारी व त्यात अनेक सहकारी गमावणारी पोलीस यंत्रणा प्रारंभीच्या काळात ही सावधगिरी बाळगत होती. २०१४ नंतर या चळवळीचा बीमोड करण्यासंदर्भातले सरकारी धोरणच बदलले. त्यात राजकीय दृष्टिकोन प्रबळ झाला.

# बलात्कारातील आरोपीला लग्नाच्या अटीवर उच्च न्यायालयातून जामीन मंजूर

मुंबई : मुंबईमधील बलात्काराच्या आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाने पीडित तरुणी सोबत लग्न करण्याच्या अटीवर जामीन मंजूर केला आहे. 2020 मध्ये आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पीडित तरुणी आणि आरोपी मुलगा हे एकमेकांना ओळखत होते, तसेच रिलेशनशिप मध्ये होते. मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी जामीन मंजूर केला आहे.

मुंबईमध्ये एका मुलीने तिच्यावर बलात्कार झाल्याचे सांगून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. तिच्या सांगण्यावरून आरोपीला पकडण्यात आले. त्याला अटक करून; न्यायालयात दाखल केल्यानंतर सुनावणी दरम्यान बलात्काराच्या आरोपीला जामीन मंजूर करण्यात आला आहे. उच्च न्यायालयाने 26 वर्षीय बलात्काराच्या आरोपीला जामीन मंजूर करताना म्हटले आहे की, जर पीडित मुलगी सापडली तर तुला वर्षभरात तिच्याशी लग्न करावे लागेल, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहे. न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी सांगितले की, पीडित आणि आरोपी दोघेही प्रौढ असून एकमेकांचे शेजारी आहेत. पीडित मुलगी 2018 पासून आरोपीला ओळखते. दोघेही संमतीने रिलेशनशिपमध्ये होते.



घरच्यांनाही त्यांच्या नात्याची माहिती असल्याने, ते लग्नासाठी तयार झाले होते. मात्र 6 महिन्यांची गरोदर राहिल्यानंतर आरोपीने तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. असे म्हटले जाते की, महिलेला तिची गर्भधारणा गुप्त ठेवायची होती म्हणून तिने घर सोडले होते. लग्नाशिवाय गरोदर राहिल्याने आपल्या कुटुंबाची बदनामी होईल अशी भीती तिला वाटत होती. 27 जानेवारी 2020 रोजी मुलाचा जन्म झाला. तीन दिवसांनी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. यानंतर महिलेने तीन दिवसांच्या बाळाला मुंबईतील मरीन लाइन्स येथे सोडले आणि पहारेकरी बाळाला उचलेपर्यंत ती तिथेच थांबली होती. 24 फेब्रुवारी 2020 रोजी महिलेने तिच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर, 25 दिवसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला. महिलेच्या तक्रारीवरून दुसऱ्याच दिवशी आरोपीला अटक करण्यात आली. मात्र ती महिला बेपत्ता असून; ती तिच्या घरीही गेली नसल्याचे पोलिस अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. तिचा मोबाईल नंबरही तात्पुरता बंद असल्याने तिचा माग काढणे कठीण आहे. आरोपींचे वकील सनी वास्कर आणि शमिश मारवाडी यांनी उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. या प्रतिज्ञापत्रात आरोपीने सांगितले की, तो पीडितेसोबत लग्न करण्यास तयार आहे आणि ते मूल दत्तक घेण्यासही तयार आहे. आरोपीच्या पालकांनीही याला दुजोरा दिला आहे. त्यावर न्यायमूर्ती डांगरे म्हणाले की, गुन्हा दाखल झाला तेव्हा पीडित मुलगी प्रौढ होती आणि तिनेही दोघांमध्ये सहमतीचे संबंध असल्याचे सांगितले होते. आरोपीला जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती डांगरे म्हणाले की, जर पीडित मुलगी वर्षभरात सापडली तर तिच्याशी लग्न करावे लागेल. आरोपीने एक वर्षानंतर पीडितेशी लग्न करणे बंधनकारक नाही, असेही उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

# जेवढं सहन झालं तेवढं सहन केलं नंतर..,
## शंभूराज देसाई यांचा पुन्हा उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल

**मुंबई :** बाळासाहेबांची शिवसेना गटाचे नेते शंभुराज देसाई यांनी पुन्हा एकदा ठाकरे गट आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. आमची बाळासाहेबांची शिवसेना आहे. आम्ही पहिल्या दिवशीपासूनच सांगत आहोत आम्ही शिवसेना सोडलेली नाही. ज्यांनी गेली अडीच तीन वर्ष वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या विचारापासून फारकत घेतली. बाळासाहेबांच्या विचारापेक्षा भिन्न विचारसरणी असलेल्या लोकांना सोबत घेऊन सत्ता स्थापन केली. हे सर्व शिवसैनिकांना त्रासदायक होत होतं. त्याचा गेली अडीच तीन वर्ष शिवसैनिकांना खूप त्रास झाला.

जेवढं आम्हाला सहन करता



आलं तेवढ आम्ही सर्वांनी सहन केलं. मात्र जेव्हा ही परिस्थिती सहन करण्याच्या पलीकडे गेली तेव्हा आम्ही उठाव केला, आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे जात आहोत. त्यामुळे मला विश्वास आहे की, सामान्य शिवसैनिक आणि राज्यातील जनता ही बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जाणा-यांसोबतच असेल असं शंभूराज देसाई यांनी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी शंभूराज देसाई यांनी अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीवर देखील प्रतिक्रिया दिली आहे. आमदार रमेश लटके यांच्या निधनामुळे ही विधानसभेची जागा रिक्त झाली आहे. ठाकरे गटाच्या वतीने या जागेसाठी ऋतुजा लटके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर भाजपाच्या वतीने मुरजी पटेल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र ही निवडणूक बिनविरोध व्हायला हवी अशी चर्चा सध्या सुरू आहे. याबाबत शंभूराज देसाई यांना विचारले असता ते म्हणाले की राज्यात अशा अनेक निवडणूका झाल्या आहेत. की अशी परिस्थिती उद्भवल्यानंतर तिथे बिनविरोध निवडणूक न होता निवडणुका घ्याव्या लागल्या. माझ्या स्वतःच्या मतदारसंघातीच उदाहरण पहा. लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी पाटण मतदारसंघाचं तब्बल 40 वर्ष प्रतिनिधित्त्व केलं. त्यांच्या निधनानंतर माझ्या वडिलांना उमेदवारी मिळाली. मात्र ती निवडणूक बिनविरोध होऊ दिली नाही. दुर्दैवाने या निवडणुकीत माझ्या वडिलांचा पराभव झाल्याचं शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे.

# अभिनेत्री मनवा नाईकसोबत कॅब चालकाचे गैरवर्तन, पोस्ट शेअर करून सांगितली आपबिती

**मुंबईः** अभिनेत्री आणि चित्रपट दिग्दर्शिका मनवा नाईक हिच्याशी मुंबईत एका उबर कॅब चालकाने गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढेच नाही तर कॅब चालकाने तिला धमकीही दिल्याचे तिने सांगितले. अभिनेत्रीने मनवा नाईक हिने शनिवारी रात्री घरी जाण्यासाठी वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथून उबेर कॅब घेतली. यादरम्यान कॅब चालकाने



तिच्याशी गैरवर्तन केले तसेच मार्गात सिग्नलवर वाहतूक पोलिसाशी वाद देखील घातला. खुद्द अभिनेत्रीने तिच्या फेसबुक पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. मात्र, मुंबई पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच, या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास सुरु केला आहे. अभिनेत्रीने तिच्या फेसबुक पोस्टमध्ये लिहिले की, 'मी रात्री 8.15 वाजता वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधून उबेर टॅक्सी घेतली. बीकेसी (वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स) येथे उबर चालकाने फोनवर बोलणे सुरू केले. ज्यावर मी आक्षेप घेतला. यानंतर बीकेसी सिग्नलही तोडला. सिग्नल तोडल्याबद्दल वाहतूक पोलिसांनी कॅब चालकाला थांबवून कॅबचा फोटो काढला. त्यावर कॅब चालकाने वाहतूक पोलिसांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली.

# राज्यातील सत्तासंघर्षाची सुनावणी आता 'या' तारखेला होणार

## राज्य सरकारचं काय होणार ?

**नवी दिल्ली :** राज्यात झालेल्या सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सत्तासंघर्षाची सुनावणी आता नोव्हेंबर मध्ये होण्याची शक्यता आहे. सुप्रीम कोर्टात राज्यातील सरकारबाबत महत्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे सुभाष देसाई यांनी महाराष्ट्र राज्यपाल यांच्या विरोधात याचिका दाखल केली होती. त्यावर 1 तारखेला सुनावणी होण्याची शक्यता असून पाच सदस्यीय घटनापीठासमोर सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटवर 01 नोव्हेंबर ही तारीख टेंटेटीव्ह म्हणून दाखवण्यात आली आहे. राज्यपालांच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी होणार असल्याने राज्यातील सत्तासंघर्षाचे काय ?

अशी चर्चा सुरू झाली असून 01 नोव्हेंबरच्या दिवशी काय निकाल लागतो याची संपूर्ण



राज्याला उत्सुकता लागून आहे. महाविकास आघाडी सरकार कोसळून शिंदे गट आणि भाजपने राज्यात सत्ता स्थापन केली होती.

राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळून राज्यात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाले असून त्याबाबतचा वाद सुप्रीम कोर्टात जाऊन पोहचला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गटाच्या सुभाष देसाई यांनी राज्यपाल यांच्या विरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आमदारांच्या निलंबनाच्या मुद्द्यासह 12 आमदारांच्या नियुक्तीवरुन राज्यपाल विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना सुरू झाला होता. विधानसभा अध्यक्ष निवडीच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीने राज्यपाल यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत थेट कोर्टात याचिका दाखल केली होती.

# घोटी परिसरात सशस्त्र दरोडा; दहा तोळे सोन्यासह लाखाची रक्कम पळवली!



नाशिकमधील इगतपुरीतालुक्यातील घोटी शहरातील सिन्नर हायवेजवळ एक धक्कादायक घटना घडली आहे. या ठिकाणी राहणारे रहिवासी श्रीकांत भदे यांच्या घरावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला करत तब्बल 10 तोळे सोने आणि एक लाख रुपयांचा दरोडा घालण्यात आला आहे. या घटनेने घोटी शहर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दहा तोळे सोन्यासह एक लाखांची रक्कम पळवली घोटी गावाजवळ श्रीकांत भदे यांचे घर असून काल रात्री मध्यरात्रीच्या दरम्यान परिसर झोपेत असताना अज्ञात दरोडेखोरांनी भदे यांच्या घरावर हल्ला केला. या हल्ल्यात दरोडेखोरांनी भदे यांच्यासह वडील जयवंत भदे आणि आई अलका भदे यांना मारहाण केली. या मारहाणीनंतर दरोडेखोरांनी घरातील तब्बल दहा तोळे सोने आणि एक लाख रुपयांची रोख रक्कम पळवून नेली आहे. मारहाणीनंतर दरोडेखोरांनी ऐवज लुटून पळ काढला. दोन्ही घरातील ऐवज लुटून नेला दरम्यान, मारहाणीनंतर भदे कुटुंबियांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी धावाधाव केली. यानंतर लुटीची घटना निदर्शनास आली आहे. या घटनेनंतर हल्लेखोरांनी आपला मोर्चा सिन्नर हायवेलगत असलेल्या जावेद खान यांच्या घरावर दरोडा घालण्याचा प्रयत्न केला. यात दरोडेखोरांनी खान यांच्या डोक्यावर तलवारीने वार करत त्यांना जखमी केले. दरोडेखोरांनी दोन्ही घरातील ऐवज लुटून नेला.



# आत्महत्येच्या पाच दिवसाआधीची अभिनेत्री वैशाली ठक्करची पोस्ट व्हायरल

**मुंबईः** टीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री वैशाली ठक्करने मध्यप्रदेशातील इंदौर येथील राहत्या घरी आत्महत्या केली आहे. आत्महत्येच्या पाच दिवसांपूर्वी वैशाली सोशल मीडियावर अक्टिव्ह होती. अत्यंत प्रसन्न मुद्रेत तिने इन्स्टाग्रामवर एक रील शेअर केला होता. या रीलमध्ये तिने एक गाणंही म्हटलं होतं. तिचा हा फनी व्हिडीओ तिच्या चाहत्यांनाही खूप आवडला होता. त्यावर तिच्या फॅन्सनी मजेदार कमेंटही केल्या होत्या. मात्र, आज ती आपल्यात नाही हे ऐकून तिच्या चाहत्यांना जबर धक्का बसला आहे.

आत्महत्या करण्याच्या पाच दिवसांपूर्वी वैशाली सोशल मीडियावर अक्टिव्ह होती. तिनेच इन्स्टाग्रामवर एक रील व्हिडीओ शेअर केला होता. त्यावर लोकांनी प्रतिक्रियाही व्यक्त केली होती. आता तिच्या मृत्यूनंतर हा व्हिडीओ वेगाने शेअर होत आहे.

वैशालीने या शेवटच्या व्हिडीओत लिप सिंक केले होते. यावेळी तिने बेबी मैं तुम्हारे लिए एक गाना गाऊ, असं म्हटलं होतं. त्यानंतर तिने, दिल-जिगर नजर क्या है, मैं तो तेरे लिए जान भी दे दूं हे गाणं म्हटलं होतं.

वैशाली ठक्करचं आयुष्य एकदम नॉर्मल सुरू होतं. मग अचानक तिने आत्महत्या का केली? असा सवाल केला जात आहे. पोलिसांना तिचा मृतदेह घरात पंख्याला लटकलेला मिळाला. तिच्या मृतदेहासोबत एक सुसाईड नोट सापडली आहे. पोलीस या सुसाईड नोटवरून पुढचा तपास करत आहे.

# अंधेरीत उमेदवार देऊ नका, राज ठाकरे यांचं पत्रं; देवेंद्र फडणवीस म्हणतात, मी एकटा...

**मुंबईः** अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवार देऊ नका. रमेश लटके हे चांगले शिवसैनिक होते. त्यांच्या पत्नी ऋतुजा लटके या विजयी होतील असं पाहा, असं आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रं लिहून केलं आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया आली आहे. राज ठाकरे यांचं म्हणणं रास्तच आहे. पण आता उमेदवार जाहीर झाला आहे. आमच्या पक्षात मी एकटा निर्णय घेत नाही. आमच्या पक्षाशी या संदर्भात बोलतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. उद्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने भाजप काय निर्णय घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली. आम्ही अंधेरी पोटनिवडणुकीत उमेदवार देऊ नये म्हणून राज ठाकरे यांनी मला पत्रं पाठवलं आहे. पण भाजपमध्ये मी एकटाच निर्णय घेऊ शकत नाही. राज ठाकरे यांनी दिलेल्या पत्रावर विचार देखील करायचा असेल तर मला माझ्या सहका-यांची आणि वरिष्ठांची चर्चा करावी लागेल. आम्ही उमेदवार घोषितही केलाय आणि उमेदवारी अर्ज देखील भरला आहे. यापूर्वी अशा काही पोटनिवडणुकांमध्ये आम्हाला योग्य प्रकारे विनंती करण्यात आली. त्यावेळी आम्ही उमेदवार दिला नव्हता. आम्ही अशा प्रकारचा निर्णय घेत नाही असं नाही, असं फडणवीस म्हणाले. आर आर पाटील यांच्या निधनानंतर झालेल्या निवडणुकीत आम्ही उमेदवार दिला नव्हता. परंतु, आता शेवटच्या स्टेजला काही भूमिका घ्यायची असेल तर मला एकट्याला निर्णय घेता येणार नाही. त्यासाठी पक्षात चर्चा करावी लागणार आहे. आमच्यासोबत बाळासाहेबांची शिवसेना आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याशी देखील चर्चा करावी लागेल.

# कुर्ला रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरच रिक्षा आणली आणि मग...

**मुंबईः** रिक्षा चालकांची अरेरावी आणि दादागीराचा त्रास प्रवाशांना नेहमीच होत असतो. प्रवाशी याबाबत वारंवार तक्रारी देखील करत असतात. अशाच एका बेजबाबदार आणि अतिउत्साही रिक्षावाल्याल्यावर थेट रेल्वे पोलिसांनी कारवाई केली आहे. या रिक्षावाल्याने थेट कुर्ला रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरच रिक्षा आणली होती. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रेल्वे पोलिसांनी या रिक्षावाल्यावर कारवाई करत त्याला कोर्टात नेले.



कुर्ला रेल्वे स्थानक हे मुंबईतील एक गजबजलेले रेल्वे स्थानक आहे. येथे प्रवाशांची नेहमीच मोठी गर्दी आणि वदर्ळ असते. अशातच एका रिक्षाचलाकाने प्रवाशांची घाबरगुंडी उडवणारे कृत्य केले आहे. एका रेल्वे प्रवाशाने या रिक्षा चालकाचा व्हिडिओ ट्विटरवर शेअर केला आहे. या व्हिडिओत कुर्ला स्थानकातील एक नंबर प्लॅटफॉर्मवर एक रिक्षा आल्याचे दिसत आहे. रिक्षाला पाहून स्टेशनवर उभे असलेले प्रवाशी रिक्षाजवळ जातात.

यानंतर हा रिक्षा चालक रिक्षा वळवतो आणि तो स्टेशनच्या बाहेर पडत असल्याचे व्हिडिओत दिसत आहे. रिक्षा वळवण्यासाठीच रिक्षा प्लॅटफॉर्मवर आणल्याचे या रिक्षाचालकाचे म्हणणे होते. ज्या व्यक्तीने हा व्हिडिओ शेअर केला त्याने रेल्वे प्रशासनालाही टॅग केले होते. व्हिडिओ पाहिल्यानंतर तात्काळ या रिक्षा चालकावर कारवाई करण्यात आली आहे.

रेल्वे अधिका-यांनी रिक्षा चालकाचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याला कुर्ला येथील आरपीएफ चौकीत आणून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच त्याची रिक्षा देखील जप्त करण्यात आली. रिक्षा चालकाला सीएसएमटी येथील रेल्वे न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला दंडासह शिक्षा देखील करण्यात आल्याचे समजते.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY
ACCEPTED HERE
पे PhonePe
G Pay
Pay

# लग्नापूर्वीचं प्रेमप्रकरण अडचण ठरू लागलं, ती त्याला करायची वारंवार पैशाची मागणी

**भंडारा :** लग्नापूर्वीची मैत्रीण वारंवार पैसे मागत होती. या ब्लॅकमेलींगला कंटाळून विवाहित तरुणानं आत्महत्या केली. असं तपासात पुढं आलं. या प्रकरणी तरुणीसह दोघांवर साकोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलाय. साकोली तालुक्यातील उमरी येथील राजेश रामकृष्ण वाघाडे (वय 32) असं मृतकाचं नाव आहे. या प्रकरणी अर्जुनी सडक तालुक्यातील कोसबी येथील अस्मिता सीताराम भोयर (वय 23) आणि साकोलीतील तिलक ठाकरे (वय 27) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय.

गेल्या शनिवारी तरुणाचा मृतदेह मोहघाटा जंगलात फाशी घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याच्या पिशवीत आढळलेल्या सुसाईट नोटमध्ये कंटाळून आत्महत्या केल्याचे पुढे आले.



राजेशने आत्महत्येपूर्वी सुसाईड नोटमध्ये अस्मिता त्याला वारंवार पैशाची मागणी करीत होती.

तसेच तिलक ठाकरे तिला पाठिंबा देत होता. शिवाय परिवारासह राजेशला बरबाद करेन, अशी धमकी दिली. त्यामुळं आपण आत्महत्या करीत असल्याचे त्याने सुसाईड नोटमध्ये लिहून ठेवलं. या याप्रकरणी तरुणीसह दोघांवर गुन्हा नोंद करण्यात आला. तपास साकोली पोलीस निरीक्षक खोकले करीत आहेत.

राजेश हा अस्मिताला समजवण्याचा प्रयत्न करत होता. माझं लग्न झालं आता जुने दिवस विसर. पण, अस्मिता काही ऐकायला तयार नव्हती. ती वारंवार पैशाची मागणी करायची. तिची कटकट केव्हा संपेल, असं राजेशला वाटायचं.

पण, त्याचा संयम सुटला. शेवटी त्यानं या कटकटीपासून दूर जाण्याचं ठरविलं. मात्र, जाताना अस्मिताचा खरा चेहरा समोर आणला. आता पोलीस अस्मिता आणि तिलक यांचा कसून तपास करत आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898